# सातारा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सह. पतसंस्था मर्या. सातारा

## ☆ परिपत्रक ☆

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, संस्थेच्या दि. ०३/०९/२०१७ रोजीच्या वार्षिक सभेतील ठराव क्र. ९ नुसार व मा. संचालक मंडळ मासिक सभा दि. ०३/१२/२०१७ मधील ठराव क्र. ६ नुसार माहे जानेवारी २०१८ पासून संस्थेची मध्यम मुदत कर्जाची मर्यादा रू. ४,००,०००/-(रू. चार लाख फक्त) करणेत आले आहे.

**१) मध्यम मुदत कर्ज रक्कम हप्ते परतफेड खालीलप्रमाणे राहिल.**

| कर्ज रक्कम | कमीत कमी हप्ते रक्कम | जास्ती जास्त हप्ते |
|---|---|---|
| ४००००० | ४००० | १०० |
| ३००००० | ३५०० | ८६ |
| २००००० | २५०० | ८० |
| १५०००० | २००० | ७५ |
| १००००० | १५०० | ६७ |
| ५०००० | १००० | ५० |

मध्यम मुदत कर्ज अर्जासोबत सभासदांनी मासिक **वेतन प्रमाणपत्र (पगाराची स्लीप) जोडणे** व **संचालकांचे शिफारस पत्र जोडणे** आवश्यक आहे.

२) तसेच तातडीचे कर्जाची मर्यादा **रू. १८,०००/- (रू. अठरा हजार फक्त)** करणेत आले आहे. **परतफेड कमीत कमी रक्कम रू. १,५००/- जास्तीत जास्त हप्ते १२ करणेत आले आहे.**

३) **कर्ज नुतणीकरण सुविधा :-** आर्थिक अडचणीत असणारे सभासदांना पतपुरवठा करता यावा म्हणून सदरचे धोरण ठरविणेत आले असून याबाबतचा पोटनियम (फ-१.१० ७ड) अस्तीत्वात आहे. तरी, घेतलेले कर्जाची ५०% टक्के वसुली झाली असलेस सभासद कर्ज नुतणीरकणांस पात्र राहील. परंतु **पुर्ण परतफेड झालेले सभासदांचे अर्जांना प्राधान्य राहील.** नुतणीकरण अर्जाची प्रतिक्षा यादी वेगळी करणेत येईल, तरी सभासदांना विनंती की, अपवादत्मक परिस्थीतीतच नुतणीकरणाचे अर्ज पाठवावेत.

संस्थेची अंतर्गत तपासणी करत असताना असे लक्षात आले आहे की, अनेक सभासद २ पेक्षा जास्त कर्जदारांना जामीन राहत आहेत. ही बाब संस्था पोटनियमाच्या विरूध्द आहे. तरी, सर्व सभासदांना विनंती करणेत येते की, जामीनदार म्हणून सही करताना आपण यापूर्वी किती सभासदांना जामीन आहोत याची खात्री करावी. तसेच कर्ज अर्ज देणारे सभासदांना विनंती करणेत येते की, आपले जामीनदार सभासद हे यापूर्वी २ पेक्षा जास्त कर्जदारांना जामीनदार आहेत किंवा नाही. याबाबत खात्री करावी.

४) मध्यम मुदत कर्ज मंजूर करताना सभासदत्वास १ वर्ष पूर्ण असणाऱ्यास ५००००/-, २ वर्ष पूर्ण असल्यास १,५०,०००/- व ३ वर्ष व तद्नंतर प्रथम कर्ज घेणाऱ्या सभासदास संपूर्ण कर्ज रक्कम म्हणजेच रू. ४,००,०००/- मंजूर करणेत येईल परंतू तीन वर्षानंतर प्रथम वेळी कर्ज सुविधा घेणाऱ्या सभासदाची शेअर्स रू. ६०,०००/- नसतील तर शेअर्स कपात १५% ने करणेत येईल.

तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

आपले विश्वासू

श्री. सतिश सोपानराव जाधव
चेअरमन
सातारा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सहकारी
पतसंस्था मर्या. सातारा